भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# विशेष न्यायालय (प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित अपराधांची संपरीक्षा) अधिनियम, १९९२

**(सन १९९२ चा अधिनियम क्रमांक २७)**

[ ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान ]

# The Special Court (Trial of Offences Relating to Transactions in Securities) Act, 1992

**(Act No. 27 of 1992)**

[*As in force on the 6th August, 2006*]

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००८

[किंमत : रुपये २२.००]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ६ ऑगस्ट, २००६ रोजी यथाविद्यमान असलेला दि स्पेशियल कोर्ट (ट्रायल ऑफ ऑफेन्सेस रिलेटिंग टू ट्रॅन्झॅक्शन्स इन सिक्युरिटीज) ॲक्ट, १९९२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १५, अंक २, दिनांक ९ नोव्हेंबर, २००६ यात पृष्ठे १३५ ते १३९ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता.

हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ९ नोव्हेंबर, २००६

**टी. के. विश्वनाथन्,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Special Court (Trial of Offences Relating to Transactions in Securities) Act, 1992 as on the 6th August, 2006 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 2, Vol. 15, dated 9th November, 2006 on pages 135 to 139.

This Authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 9th November, 2006.

T. K. VISHWANATHAN,
Secretary to the
Government of India.

# विशेष न्यायालय (प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित अपराधांची संपरीक्षा) अधिनियम, १९९२

## कलमांचा क्रम

**कलमे**


१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. अभिरक्षकाची नियुक्ती व कर्तव्ये.

४. कपटपूर्वक केलेली कंत्राटे रद्द करता येतील.

५. विशेष न्यायालयाची स्थापना.

५क. विशेष न्यायालयाच्या न्यायाधीशांमध्ये प्रकरणांची वाटणी.

६. विशेष न्यायालयाने प्रकरणांची दखल घेणे.

७. विशेष न्यायालयाची अधिकारिता.

८. संयुक्त संपरीक्षेबाबतची विशेष न्यायालयाची अधिकारिता.

९. विशेष न्यायालयाची कार्यपद्धती व अधिकार.

९क. दिवाणी बाबींमधील विशेष न्यायालयाची अधिकारिता, अधिकार आणि कार्यपद्धती.

९ख. लवादाच्या बाबींमध्ये विशेष न्यायालयाचे अधिकार.

१०. अपील.

११. दायित्वे चुकती करणे.

११क. अवमान केल्याबद्दल शिक्षा देण्याचा अधिकार.

१२. सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.

१३. या अधिनियमाचा अधिभावी प्रभाव असणे.

१४. नियम करण्याचा अधिकार.

१५. निरसन व व्यावृत्ती.

**इंग्रजी - मराठी शब्दसूची**

**मराठी - इंग्रजी शब्दसूची**

# विशेष न्यायालय (प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित अपराधांची संपरीक्षा) अधिनियम, १९९२

**(१९९२ चा अधिनियम क्रमांक २७)**

(६ ऑगस्ट २००६ रोजी यथाविद्यमान)

[ १८ ऑगस्ट, १९९२]

**प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित अपराधांची संपरीक्षा करण्यासाठी विशेष न्यायालय घटित करणे याकरिता आणि त्याच्याशी संबंधित व तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या त्रेचाळिसाव्या वर्षी, संसदेद्वारे तो पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास, "विशेष न्यायालय (प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित अपराधांची संपरीक्षा) अधिनियम, १९९२" असे म्हणावे.

(२) या, दिनांक ६ जून १९९२ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "संहिता" याचा अर्थ, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २), असा आहे ;

(ख) "अभिरक्षक" याचा अर्थ, कलम ३ पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेला अभिरक्षक, असा आहे ;

(ग) "प्रतिभूती" यामध्ये पुढील बाबींचा अंतर्भाव होतो :—

(एक) शेअर, स्क्रिप्टस्, रोखे, बंधपत्रे, ऋणपत्रे, कर्जरोखे, भारतीय युनिट ट्रस्टची किंवा इतर कोणत्याही म्युच्युअल फंडाची युनिटे किंवा कोणतीही विधिसंस्थापित कंपनी किंवा इतर निगमनिकाय यांतील किंवा त्यांच्या तशाच प्रकारच्या इतर पणनयोग्य प्रतिभूती ;

(दोन) शासकीय प्रतिभूती ; आणि

(तीन) प्रतिभूतींमधील हक्क किंवा हितसंबंध ;

(घ) "विशेष न्यायालय" याचा अर्थ, कलम ५, पोटकलम (१) अन्वये घटित केलेले विशेष न्यायालय, असा आहे.

**अभिरक्षकाची नियुक्ती व कर्तव्ये.**

**३.** (१) केंद्र सरकारला, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, त्याला योग्य वाटेल त्याप्रमाणे एका किंवा अधिक अभिरक्षकांची नियुक्ती करता येईल.

(२) एखादी व्यक्ती, १ एप्रिल १९९१ या दिनांकानंतर आणि ६ जून १९९२ या दिनांकापूर्वी प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित कोणत्याही अपराधात सहभागी आहे, याबाबत माहिती मिळाल्यावरून, अभिरक्षकाची जर तशी खात्री झाली तर, तो, अशा व्यक्तीचे नाव **राजपत्रात** अधिसूचित करील.

(३) संहितेत किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, पोटकलम (२) खालील अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकास व तेव्हापासून, त्या पोट-कलमान्वये अधिसूचित केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या मालकीची कोणतीही स्थावर अथवा जंगम मालमत्ता किंवा दोन्हीवर, ती अधिसूचना जारी झाल्याबरोबर त्याचवेळी जप्ती आणण्यात येईल.

(४) अभिरक्षक, पोटकलम (३) अन्वये जप्ती आणलेली मालमत्ता, विशेष न्यायालय निदेश देईल अशा रीतीने हाताळील.

(५) अभिरक्षकाला, या कलमाखालील आणि कलम ४ खालील अधिकार वापरताना किंवा त्याची कर्तव्ये पार पाडताना कोणत्याही व्यक्तीचे सहाय्य घेता येईल.

(शा.म.मु.) एच ४१६२—२ (१०४०—५-०८)

**कपटपूर्वक केलेली कंत्राटे रद्द करता येतील.**

४. (१) अभिरक्षकाची, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर जर अशी खात्री पटली की, १ एप्रिल १९९१ या दिनांकानंतर आणि ६ जून १९९२ या दिनांकास किंवा त्या दिनांकापूर्वी कोणत्याही वेळी, कलम ३, पोटकलम (२) खाली अधिसूचित केलेल्या व्यक्तीच्या कोणत्याही मालमत्तेच्या संबंधात केलेले कोणतेही कंत्राट किंवा करार, कपटपूर्वक किंवा या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून केलेले असेल तर, त्यास असे कंत्राट किंवा करार रद्द करता येईल आणि असे रद्द केल्यानंतर अशा मालमत्तेवर या अधिनियमान्वये जप्ती आणता येईल :

परंतु, अशा कंत्राटात अथवा करारात पक्षकार असलेल्या व्यक्तींना आपले म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी दिल्याशिवाय, असे कंत्राट किंवा करार रद्द केला जाणार नाही.

(२) कलम ३, पोटकलम (२) अन्वये जारी केलेली कोणतीही अधिसूचना, किंवा कलम ४, पोटकलम (१) अन्वये रद्द केलेले कंत्राट किंवा करार, किंवा कलम ३ अथवा ४ याअन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, अभिरक्षकाने दिलेला कोणताही आदेश, यांमुळे व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, जेव्हा विशेष न्यायालय (प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित अपराधांची संपरीक्षा) विधेयक, १९९२ याला राष्ट्रपतींची मान्यता मिळण्यापूर्वी अशी अधिसूचना काढण्यात आली असेल, आणि असे कंत्राट किंवा करार रद्द करण्यात आले असेल किंवा आदेश देण्यात आला असेल तेव्हा, विशेष न्यायालय (प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित अपराधांची संपरीक्षा) विधेयक, १९९२ यास राष्ट्रपतींची मान्यता मिळाल्यापासून ३० दिवसांच्या आत आणि जेव्हा अशा तारखेस किंवा त्यानंतर अशी अधिसूचना काढण्यात आली असेल, कंत्राट किंवा करार रद्द करण्यात आला असेल किंवा आदेश देण्यात आला असेल तेव्हा, यथास्थिति, अशी अधिसूचना काढल्याच्या किंवा करार किंवा कंत्राट रद्द करण्याच्या किंवा आदेश देण्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, त्यावर आक्षेप घेणारा विनंतीअर्ज विशेष न्यायालयासमोर दाखल करता येईल आणि विशेष न्यायालयास, पक्षकारांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

**विशेष न्यायालयाची स्थापना.**

५. (१) केंद्र सरकार, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विशेष न्यायालय या नावाचे एक न्यायालय स्थापन करील.

(२) हे विशेष न्यायालय, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांतर्गत विशेष न्यायालय आहे त्या उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीने, भारताच्या मुख्य न्यायमूर्तींच्या सहमतीने नामनिर्देशित केलेल्या [१][एका किंवा अधिक पीठासीन न्यायाधीशांचे] मिळून बनलेले असेल.

[२][(३) [३][विशेष न्यायालयाच्या एखाद्या न्यायाधीशाचे] पद अनुपस्थितीच्या अथवा रजेच्या कारणास्तव रिक्त असेल तेव्हा, त्या पदाची कर्तव्ये, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांतर्गत ते विशेष न्यायालय असेल त्या उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीने, भारताच्या मुख्य न्यायमूर्तींच्या सहमतीने त्या प्रयोजनासाठी नामनिर्देशित केलेला त्या उच्च न्यायालयाचा न्यायाधीश पार पाडील आणि अशाप्रकारे नियुक्त केलेल्या न्यायाधीशास, [३][विशेष न्यायालयाच्या एखाद्या न्यायाधीशास] असलेल्या सर्व अधिकारिता व अधिकार असतील, त्यात अंतिम आदेश देण्याच्या अधिकाराचाही समावेश असेल.]

**विशेष न्यायालयाच्या न्यायाधीशांमध्ये प्रकरणांची वाटणी.**

[४][**५क.** जेव्हा विशेष न्यायालय दोन किंवा अधिक न्यायाधीशांनी मिळून बनलेले असेल तेव्हा, ते विशेष न्यायालय, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादांतर्गत असेल त्या उच्च न्यायालयाचा मुख्य न्यायमूर्ती वेळोवेळी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, न्यायाधीशांमध्ये प्रकरणांचे वाटप करण्याची तरतूद करील आणि अशा प्रत्येक न्यायाधीशाद्वारे ज्या बाबींवर कार्यवाही करण्यात येईल त्या बाबी विनिर्दिष्ट करील.]

---

१. १९९७ चा अधिनियम ६,कलम २(क) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१६ जानेवारी १९९७ रोजी व तेव्हापासून).

२. १९९४ चा अधिनियम २४, कलम २ द्वारे दाखल केले (२५ जानेवारी, १९९४ रोजी व तेव्हापासून).

३. १९९७ चा अधिनियम ६, कलम २(ख ) द्वारे मूळ मजकुराऐवजी दाखल केले (१६ जानेवारी १९९७ रोजी व तेव्हापासून).

४. १९९४ चा अधिनियम २४ याच्या कलम ३ द्वारे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले (१६ जानेवारी १९९७ रोजी व तेव्हापासून ).

**विशेष न्यायालयाने प्रकरणांची दखल घेणे.**

**६.** विशेष न्यायालय, यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे, त्याच्यापुढे दाखल केलेल्या किंवा त्याच्याकडे हस्तांतरित केलेल्या अशा प्रकरणांची दखल घेईल किंवा संपरीक्षा करेल.

**विशेष न्यायालयाची अधिकारिता.**

**७.** इतर कोणत्याही कायद्यात अंतर्भूत असले तरी, कलम ३, पोट कलम (२) मध्ये निर्देश केलेल्या कोणत्याही अपराधाबाबतचा कोणताही खटला फक्त विशेष न्यायालयातच दाखल करण्यात येईल आणि अशा अपराधाबाबत कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेला कोणताही खटला विशेष न्यायालयाकडे हस्तांतरित होईल.

**संयुक्त संपरीक्षेबाबतची विशेष न्यायालयाची अधिकारिता.**

**८.** विशेष न्यायालयास, कलम ३, पोटकलम (२) मध्ये निर्देश केलेल्या अपराधाची प्रकर्ता, कटकर्ता किंवा अपप्रेरक म्हणून संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीची आणि त्याचबरोबर संहितेनुसार ज्यांची संयुक्तपणे संपरीक्षा करणे शक्य आहे, अशा इतर सर्व अपराधांची व आरोपी व्यक्तींची संपरीक्षा करण्याची अधिकारिता असेल.

**विशेष न्यायालयाची कार्यपद्धती व अधिकार.**

**९.** (१) विशेष न्यायालय, अशा खटल्यांची संपरीक्षा करताना, संहितेत विहित केलेली, दंडाधिकाऱ्यापुढील वॉरंट खटल्यांची संपरीक्षा करताना अनुसरावयाची कार्यपद्धती अनुसरील.

(२) या अधिनियमात स्पष्टपणे अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीजकरून, संहितेच्या तरतुदी, जेथवर त्या या अधिनियमाशी विसंगत नसतील तेथवर, विशेष न्यायालयापुढील कार्यवाहीला लागू होतील आणि संहितेच्या उक्त तरतुदींच्या प्रयोजनांसाठी, विशेष न्यायालय हे सत्र न्यायालय आहे, असे मानण्यात येईल व त्याला सत्र न्यायालयाचे सर्व अधिकार असतील आणि विशेष न्यायालयापुढे खटला चालविणाऱ्या व्यक्तीला सरकारी अभियोक्ता मानण्यात येईल.

(३) विशेष न्यायालय, त्याने दोषी ठरविलेल्या कोणत्याही व्यक्तीला, ती ज्या अपराधाची दोषी ठरविण्यात आली असेल, त्या अपराधासाठी कायद्याद्वारे प्राधिकृत केली असेल अशी कोणतीही शिक्षा देईल.

(४) विशेष न्यायालय, त्याच्यापुढे आणलेली इतर कोणतीही बाब हाताळताना, स्वाभाविक न्यायाच्या तत्त्वांशी सुसंगत असेल अशी, त्याला योग्य वाटणारी अशी कार्यपद्धती अनुसरील.

**दिवाणी बाबींमधील विशेष न्यायालयाची अधिकारिता, अधिकार आणि कार्यपद्धती.**

[१][**९क.** (१) विशेष न्यायालय (प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित अपराधांची संपरीक्षा) सुधारणा अधिनियम, १९९४ याच्या प्रारंभाच्या दिनांकास व तेव्हापासून, विशेष न्यायालय,—

(क) कलम ३ च्या पोटकलम (३) खाली जप्ती आणलेल्या कोणत्याही मालमत्तेच्या संबंधातील ;

(ख) १ एप्रिल १९९१ या दिनांकानंतर आणि ६ जून १९९२ या दिनांकास किंवा त्यापूर्वी केलेल्या, प्रतिभूतींमधील ज्या व्यवहारात कलम ३ च्या पोटकलम (२) खाली अधिसूचित केलेली व्यक्ती, पक्षकार, दलाल, मध्यस्थ किंवा इतर कोणत्याही रीतीने अंतर्भूत असेल अशा व्यवहारातून उद्‌भवणाऱ्या, कोणत्याही बाबीच्या किंवा दाव्याच्या संबंधात,

कोणतेही दिवाणी न्यायालय, अशा अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी वापरीत होते अशा सर्व अधिकारिता, अधिकार आणि प्राधिकार वापरील.

(२) विशेष न्यायालय (प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित अपराधांची संपरीक्षा) सुधारणा अधिनियम, १९९४ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही न्यायालयासमोर प्रलंबित असलेला व ज्या कारणावर तो आधारित आहे ते कारण अशा प्रारंभानंतर उद्‌भवले असते तर, तो पोट-कलम (१) खालील विशेष न्यायालयाच्या अधिकारितेत आला असता अशा वादकारणावर आधारित असा, प्रत्येक वाद, हक्कमागणी किंवा (अपिलाखेरीज) इतर विधिविषयक कार्यवाही ही, अशा अधिनियमाच्या प्रारंभानंतर विशेष न्यायालयाकडे हस्तांतरित होईल आणि विशेष न्यायालयाला, असा वाद, हक्कमागणी किंवा इतर विधिविषयक कार्यवाही यांचा अभिलेख मिळाल्यानंतर, शक्य असेल तेथवर, अशा हस्तांतरणापूर्वी किंवा ज्या टप्प्यावर तो वाद, हक्कमागणी किंवा विधिविषयक कार्यवाही असेल, त्या टप्प्यापासून किंवा विशेष न्यायालयाला योग्य वाटेल अशा आधीच्या कोणत्याही टप्प्यापासून किंवा नव्याने तो चालू करता येईल.

---

१. १९९४ चा अधिनियम २४, कलम ३ द्वारे दाखल केले (२५ जानेवारी १९९४ रोजी व तेव्हापासून).

(३) विशेष न्यायालय (प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित अपराधांची संपरीक्षा) सुधारणा अधिनियम, १९९४ याच्या प्रारंभाच्या दिनांकास आणि तेव्हापासून, विशेष न्यायालयाखेरीज अन्य कोणत्याही न्यायालयाला, पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात किंवा हक्कमागणीच्या संबंधात कोणतीही अधिकारिता, अधिकार किंवा प्राधिकार नसेल किंवा त्यांचा वापर करण्यास ते हक्कदार नसेल.

(४) या कलमाखालील कोणत्याही बाबीसंदर्भात वा हक्कमागणीच्या संदर्भात कार्यवाही करतानां विशेष न्यायालय, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) द्वारे घालून दिलेल्या कार्यपद्धतीशी बांधील नसेल, परंतु, स्वाभाविक न्यायाच्या तत्त्वाच्या मार्गदर्शनानुसार ते काम करील आणि या अधिनियमाच्या आणि कोणत्याही नियमांच्या तरतुदींच्या अधीनतेने, विशेष न्यायालयास, त्याच्या स्वतःच्या कार्यपद्धतीचे विनियमन करण्याचा अधिकार असेल.

(५) या अधिनियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या इतर अधिकारांना बाध येऊ न देता, विशेष न्यायालयाला या कलमाखालील त्याची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अन्वये पुढील बाबींसंबंधातील वादाची संपरीक्षा करताना, दिवाणी न्यायालयाकडे निहित असलेले तेच अधिकार असतील, त्या बाबी अशा,—

(क) कोणत्याही व्यक्तीला समन्स पाठविणे व उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तिची तपासणी करणे ;

(ख) कागदपत्रे शोध घेण्यास व सादर करण्यास फर्मावणे ;

(ग) शपथपत्रांवर साक्षीपुरावा घेणे ;

(घ) भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ (१८७२ चा १) याची कलमे १२३ आणि १२४ यांच्या तरतुदींच्या अधीनतेने, कोणत्याही कार्यालयातून कोणताही सरकारी अभिलेख किंवा दस्तऐवज किंवा अशा अभिलेखाची किंवा दस्तऐवजाची प्रत मागविणे ;

(ङ) साक्षीदारांची अथवा दस्तऐवजांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढणे ;

(च) आपल्या निर्णयांचे पुनर्विलोकन करणे ;

(छ) एखादा खटला, कसूर केल्याच्या कारणास्तव खारीज करणे किंवा त्यावर एकतर्फी निर्णय देणे ;

(ज) कोणताही खटला कसूर केल्याच्या कारणास्तव खारीज केल्याचा कोणताही आदेश किंवा त्याने एकतर्फी दिलेला कोणताही आदेश रद्द करणे ; आणि

(झ) कलम १४ च्या पोटकलम (१) अन्वये केंद्र सरकारकडून विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

**लवादाच्या बाबींमध्ये विशेष न्यायालयाचे अधिकार.**

**९ख.** (१) विशेष न्यायालयाला, कलम ९क च्या पोटकलम (१) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही बाबींशी किंवा हक्कमागणीशी संबंधित कोणत्याही निर्देशाचा विषय असलेल्या कोणत्याही प्रश्नावर निर्णय देण्यासाठी लवाद अधिनियम, १९४० (१९४० चा १०) अन्वये न्यायालयाला प्रदान केलेल्या अधिकारिता व अधिकार असतील.

(२) विशेष न्यायालय (प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित अपराधांची संपरीक्षा) सुधारणा अधिनियम, १९९४ याच्या प्रारंभाच्या तारखेच्या लगतपूर्वी कोणत्याही न्यायालयापुढे प्रलंबित असलेला आणि लवाद अधिनियम, १९४० (१९४० चा १०) द्वारे नियमन केला जाणारा , कलम ९ क च्या पोटकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली कोणतीही बाब किंवा हक्कमागणी या संबंधातील असलेला प्रत्येक वाद किंवा (अपिलाखेरीज) अन्य कार्यवाही ही, त्या दिनांकापासून विशेष न्यायालयाकडे हस्तांतरित होईल.

**स्पष्टीकरण .—** या कलमाच्या प्रयोजनासाठी, अनुक्रमे "न्यायालय" आणि "निर्देश" या शब्दप्रयोगांना लवाद अधिनियम, १९४० (१९४० चा १०) याच्या कलम २, खंड (ग) आणि (ङ) अन्वये नेमून दिलेले ते ते अर्थ असतील.]

**अपील.**

**१०.** (१) संहितेत [१][ किंवा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) किंवा लवाद अधिनियम, १९४० (१९४० चा १०)] यात काहीही अंतर्भूत असले तरी, विशेष न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, शिक्षादेश किंवा, अंतर्वादिक आदेश नसेल असा कोणताही आदेश, यांच्याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयाकडे, तथ्य व कायदा या दोहोंवर आधारित अपील दाखल करता येईल.

(२) पूर्वोक्तानुसार असेल त्याखेरीज, विशेष न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, [१][हुकूमनामा], शिक्षादेश अथवा आदेश यांच्याविरुद्ध कोणतेही अपील किंवा पुनरीक्षण अर्ज कोणत्याही न्यायालयात दाखल करता येणार नाही.

(३) या कलमाखालील प्रत्येक अपील, विशेष न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, [१][हुकूमनामा], शिक्षादेश किंवा आदेश दिल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत दाखल करण्यात येईल :

परंतु, तीस दिवसांच्या उक्त कालावधीत अपील दाखल न करण्यास अपीलकर्त्याकडे पुरेसे कारण होते याबद्दल विशेष न्यायालयाचे समाधान झाले तर, ते न्यायालय, उक्त तीस दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतरही अपील दाखल करून घेईल.

**दायित्वे चुकती करणे.**

**११.** (१) संहितेत आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, विशेष न्यायालयाला, जप्ती आणलेल्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्यासाठी अभिरक्षकाला निदेश देणारा, त्याला योग्य वाटेल असा, कोणताही आदेश देता येईल.

(२) पुढील दायित्वे, शक्य असतील तेथवर, खालील क्रमाने पूर्णत: चुकती करण्यात येतील किंवा फेडण्यात येतील :—

(क) कलम ३, पोटकलम (२) अन्वये अभिरक्षकाने अधिसूचित केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून, केंद्र सरकार किंवा राज्य शासन अथवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण यांना देय असलेला सर्व महसूल, कर, उपकर आणि पट्टी ;

(ख) अभिरक्षकाने अशाप्रकारे अधिसूचित केलेल्या व्यक्तीकडून कोणतीही बँक किंवा वित्तीय संस्था किंवा म्युच्युअल फंड यांस देय असलेल्या सर्व रकमा ;

(ग) विशेष न्यायालय, वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशी कोणतीही इतर दायित्वे.

**अवमान केल्याबद्दल शिक्षा देण्याचा अधिकार.**

[२][**११क.** विशेष न्यायालयास त्याच्या अवमानाबाबत, एखाद्या उच्च न्यायालयास ज्या अधिकारिता, अधिकार आणि प्राधिकार असतात आणि ज्याचा ते वापर करते त्याच अधिकारिता, अधिकार आणि प्राधिकार असतील आणि त्यांचा त्याला वापर करता येईल आणि या प्रयोजनासाठी, न्यायालय अवमान अधिनियम, १९७१ (१९७१ चा ७०) याच्या तरतुदी पुढील फेरबदलांसह प्रभावी असतील :—

(क) त्या तरतुदींमधील उच्च न्यायालयाशी संबंधित निर्देशांचा अर्थ, त्यात अशा विशेष न्यायालयाबाबतचा निर्देश अंतर्भूत असल्याप्रमाणे लावण्यात येईल ;

(ख) उक्त अधिनियमाच्या कलम १५ मधील महाअधिवक्त्याशी संबंधित निर्देशाचा अर्थ, विशेष न्यायालयाच्या संबंधात तो महा न्यायवादी किंवा महा न्यायाभिकर्ता अथवा अपर महा न्यायाभिकर्ता यांच्या संबंधातील निर्देश असल्याप्रमाणे लावण्यात येईल.]

**सद्भावपूर्वक केलेल्या कृतीस संरक्षण.**

**१२.** (१) या अधिनियमान्वये सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधात केंद्र सरकार किंवा अभिरक्षक यांच्याविरुद्ध कोणताही वाद, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

(२) या अधिनियमान्वये सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे झालेले कोणतेही नुकसान किंवा होणारे संभाव्य नुकसान याकरिता, केंद्र सरकार किंवा त्याचा कोणताही अधिकारी किंवा इतर कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

---

१. १९९४ चा अधिनियम २४, कलम ४ द्वारे दाखल केले (२५ जानेवारी १९९४ रोजी व तेव्हापासून).

२. वरील अधिनियमाच्या कलम ५ द्वारे दाखल केले (२५ जानेवारी १९९४ रोजी व तेव्हापासून).

**या अधिनियमाचा अधिभावी प्रभाव असणे.**

१३. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात किंवा या अधिनियमाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कायद्याच्या आधारे अंमलात असलेल्या कोणत्याही संलेखात किंवा कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या किंवा अन्य प्राधिकरणाच्या कोणत्याही हुकूमनाम्यात किंवा आदेशात या अधिनियमाशी काहीही विसंगत असले तरी, या अधिनियमाच्या तरतुदी प्रभावी ठरतील.

**नियम करण्याचा अधिकार.**

१४. (१) केंद्र सरकारला, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करण्यासाठी नियम करता येतील.

(२) केंद्र सरकारद्वारे, या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर, ते सत्रासीन असताना, एका सत्राने बनलेल्या अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता सत्रासीन असताना ठेवला जाईल, आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्राच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी जर त्या नियमात कोणतेही आपरिवर्तन करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले, अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा आपरिवर्तित स्वरूपातच परिणामक होईल, किंवा, यथास्थिती, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा आपरिवर्तनामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

**निरसन व व्यावृत्ती.**

१५. (१) विशेष न्यायालय (प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित अपराधांची संपरीक्षा) अध्यादेश, १९९२ (१९९२ चा अध्यादेश १०) हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कारवाई ही, या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये करण्यात आल्याचे किंवा केल्याचे मानण्यात येईल.

## THE SPECIAL COURT (TRIAL OF OFFENCES RELATING TO TRANSACTIONS IN SECURITIES) ACT, 1992

## विशेष न्यायालय (प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित अपराधांची संपरीक्षा) अधिनियम, १९९२

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| Additional Solicitor-General | अपर सॉलिसिटर जनरल | [Section 11 *A* (*b*)] |
| Advocate-General | महाअधिवक्ता | [Section 11 (*a*)] |
| agreement | करार | [Section 4 (*1*)] |
| arbitration | लवाद | [Section 9 *b*] |
| Attorney-General | महान्यायवादी | [Section 11 *A* (*b*)] |
| bonds | बंधपत्रे | [Section 2 (*c*) (*i*)] |
| civil matter | दिवाणी बाब | [Section 9 *a*] |
| code | संहिता | [Section 2 (*a*)] |
| contempt | अवमान | [Section 11 (*a*)] |
| contract | कंत्राट | [Section 4 (*1*)] |
| custodian | अभिरक्षक | [Section 2 (*b*)] |
| debenture stock | कर्जरोखे | [Section 2 (*c*) (*1*)] |
| debentures | ऋणपत्रे | [Section 2 (*c*) (*1*)] |
| discharge of liabilities | दायित्वे चुकती करणे | [Section 11 (*m.n.*)] |
| dismissal of a case | खटला खारीज करणे | [Section 9 *A* (*5*) (*g*)] |
| fraudulently | कपटपूर्वक | [Section 4 (*m.n.*)] |
| government security | शासकीय प्रतिभूती | [Section 2 (*c*) (*ii*)] |
| joint trial | संयुक्त संपरीक्षा | [Section (*8*)] |
| jurisdiction | अधिकारिता | [Section 5 (*2*)] |
| party | पक्षकार | [Section 4 (*1*) (परंतुक)] |
| sitting judge | पीठासीन न्यायाधीश | [Section 5 (*2*)] |
| Solicitor-General | महा न्यायभिकर्ता | [Section 11 *A* (*b*)] |
| special court | विशेष न्यायालय | [Title] |
| stocks | रोखे | [Section 2 (*c*) (*i*)] |
| transaction in securities | प्रतिभूतींमधील व्यवहार | [Title] |
| trial of offences | अपराधांची संपरीक्षा | [Title] |

# विशेष न्यायालय (प्रतिभूतींमधील व्यवहारांशी संबंधित अपराधांची संपरीक्षा) अधिनियम, १९९२

# THE SPECIAL COURT (TRIAL OF OFFENCES RELATING TO TRANSACTIONS IN SECURITIES) ACT, 1992

## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अपर सॉलिसिटर जनरल | Additional Solicitor-General | [कलम ११ (क) (ख)] |
| अपराधांची संपरीक्षा | trial of offences | [शीर्षक] |
| अधिकारिता | jurisdiction | [कलम ५ (२)] |
| अभिरक्षक | custodian | [कलम २ (ख)] |
| अवमान | contempt | [कलम ११ (क )] |
| ऋणपत्रे | debentures | [कलम २ (ग) (एक)] |
| कपटपूर्वक | fraudulently | [कलम ४ (समास टीप)] |
| कर्जरोखे | debenture stock | [कलम २ (ग) (एक)] |
| करार | agreement | [कलम ४ (१)] |
| कंत्राट | contract | [कलम ४ (१)] |
| खटला खारीज करणे | dismissal of a case | [कलम ९क (५) (छ)] |
| दायित्वे चुकती करणे | discharge of liabilities | [कलम १ (समासटीप)] |
| दिवाणी बाब | civil matter | [कलम ९ (क)] |
| पक्षकार | party | [कलम ४ (१) (परंतुक)] |
| पीठासीन न्यायाधीश | sitting judge | [कलम ५ (२)] |
| प्रतिभूतींमधील व्यवहार | transaction in securities | [शीर्षक] |
| बंधपत्रे | bonds | [कलम २ (ग) (एक)] |
| महाअधिवक्ता | Advocate-General | [कलम ११ (क)] |
| महान्यायवादी | Attorney-General | [कलम ११ क (ख)] |
| रोखे | stocks | [कलम २ (ग) (एक)] |
| लवाद | arbitration | [कलम ९ (ख)] |
| विशेष न्यायालय | special court | [शीर्षक] |
| शासकीय प्रतिभूती | government security | [कलम २ (ग) (दोन)] |
| सॉलिसिटर जनरल | Solicitor-General | [कलम ११ क (ख)] |
| संयुक्त संपरीक्षा | joint trial | [कलम (८)] |
| संहिता | code | [कलम २ (क)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई